RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : २०

दि. ०८ मे २०२६, वार : शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

## व्ही एस पँथर्स आयोजित ७ व्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याच्या मंडप उभारणीचा शुभारंभ

**लातूर/प्रतिनिधी** : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त ७ वा सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा येत्या १० मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. त्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर पार्क याठिकाणी मंडप शुभारंभ माजी आमदार बब्रुवान खंदाडे ,यशवंत नागरी सहकारी बँकेचे चेअरमन प्रा सुहास पाचपुते , पत्रकार अशोक हनवते, नेताजी बादाडे यांच्या हस्ते करण्यात आला .

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नारळ वाढवून मंडप उभारणीच्या शुभारंभ करण्यात आला. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद भाऊ खटके यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के, मराठवाडा अध्यक्ष निलेश कांबळे संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक संतोष मांदळे रवी कुरील मराठवाडा विद्यार्थी आघाडी अध्यक्ष प्रीतम दंडे कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष किरण पायाळ, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्नील कांबळे, ऑटो युनियन जिल्हाध्यक्ष देवा गायकवाड, जिल्हाउपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड, जिल्हाकार्याध्यक्ष अकबर शेख, वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार, जिल्हा संघटक गोविंद कांबळे, सुरज सूर्यवंशी, अजय सूर्यवंशी, सज्जन शेख,



यासिन शेख, उमेश गायकवाड, असित कांबळे, आनंद कांबळेसह पदाधिकारी उपस्थित होते .



**व्ही एस पँथर्स आयोजित ७ व्या सर्वधर्मीय सामुहिक विवाह सोहळ्याचे निमंत्रण पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना देताना सं.अध्यक्ष विनोद खटके, संतोष मांदळे, रवि कुरील, पंकज शिंदे, सूरज सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.**

## गरुड चौक ते पिंटू हॉटेल येथे पोलीस मदत केंद्रा सह कायमस्वरुपी वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची पुर्व भाग कृती समितीची शहाजी उमाप यांच्या कडे मागणी



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर पूर्व भागात वाढती गुन्हेगारी लक्षात घेऊन पूर्व भागात पोलीस पेट्रोलींग वाढवून गरुड चौकात पोलीस मदत केंद्रासह सिग्नल सुरू करून वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीची विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप व लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात आयोजित जनता दरबारात मागणी करण्यात आली.

निवेदनात लातूर शहर पूर्व भागातील गरुड चौकात मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असून अपघाताच्या व गुन्हेगारी प्रमाणत वाढ झाल्याचे दिसून येत आहे स्थानिक नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे तसेच गरुड चौक चौकातून गेलेला ३६१ महामार्ग विकसित झाल्यापासून वेगवान वाहतुकीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने अपघाताच्या प्रमाणात वाढ झाली आहे त्या दृष्टीने वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने सिग्नल सुरू नाहीत वाहतूक शिस्ती करिता वाहतूक पोलीस नियुक्त नाहित याची गांभीर्याने दखल घेऊन गरुड चौक,पिटु हॉटेल परिसरात पोलीस मदत केंद्रासह गरुड चौकात कायमस्वरूपी वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची निवेदनाच्या माध्यमातून मागणी करण्यात आली.

सदरील निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, समितीचे सचिव बाबासाहेब बनसोडे,संजय उदारे, भगवेश्र्वर धनगर, इत्यादि च्या स्वाक्षऱ्या होत्या

## चाईल्डलाईन इंडिया फाऊंडेशन यांच्या मदतीने अल्पवयीन मुलीचा बालविवाह थांबविण्यात गांधी चौक पोलिसांना यश



**लातूर/प्रतिनिधी** : अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह वेळेत रोखण्यात महाराष्ट्र पोलीस अंतर्गत गांधी चौक पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना यश आले आहे. दुर्गेश्वरी (वय १७ वर्षे ०७ महिने, रा. लिंबाळा दाऊ, ता. औसा, जि. लातूर) ही मुलगी गुरुवार ७ मे रोजी गांधी चौक पोलीस स्टेशन येथे मदत मागण्यासाठी आली होती.

तिने पोलिसांना सांगितले की, ती अल्पवयीन असून तिचे आई-वडील तिचे लग्न उद्या दि. ९ मे रोजी लावून देत आहेत. त्यावेळी ठाणे अंमलदार राखी गायकवाड या कर्तव्यावर होत्या. त्यांनी तसेच पोलीस कॉन्स्टेबल राहुल दरोडे व पोलीस कॉन्स्टेबल सचिन जाधव यांनी तत्परतेने टीमवर्क करून परिस्थितीचे गांभीर्य ओळखले.

पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड, गांधी चौक पोलीस स्टेशन यांच्या आदेशान्वये तातडीने Childline India Foundation येथे संपर्क साधण्यात आला. त्यानंतर मुलीच्या सुरक्षिततेसाठी दामिनी पथकाच्या मदतीने तिला मीनाक्षी कोंगे मॅडम यांच्या ताब्यात चाईल्ड लाईन येथे सुपूर्द करण्यात आले. या तत्पर कारवाईमुळे एका अल्पवयीन मुलीचा बालविवाह थांबविण्यात पोलिसांना यश आले असून परिसरात या कामगिरीचे कौतुक होत आहे.

## लखनौच्या गोलंदाजाला रोहित-विराटसह जिंकायचा आहे २०२७चा वर्ल्डकप

**मुंबई/प्रतिनिधी :** लखनौ सुपर जायंट्स संघाची यंदाच्या आयपीएलमधील कामगिरी फारशी चांगली राहिली नसली तरी त्यांच्या गोलंदाजी विभागाने मात्र प्रभावित केलं. लखनौचा गोलंदाज प्रिन्स यादवने यंदाच्या स्पर्धेत चांगली गोलंदाजी करत आपली प्रतिभा सिद्ध केली. प्रिन्स यादवला रोहित शर्मा व विराट कोहली यांच्याबरोबर आगामी २०२७ चा विश्वचषक खेळण्याची इच्छा आहे आणि त्यांच्यासाठी हा विश्वचषक त्याला जिंकायचा देखील आहे. याचा व्हीडिओ लखनौ संघाने सोशल मीडियावर शेअर केला आहे.

## इस्रायलमध्ये होम-बेस्ड केअरगिव्हर नोकऱ्यांसाठी लातूर जिल्ह्यातील युवक-युवतींना सुवर्णसंधी

**लातूर :** केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या पुढाकारातून आणि नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन एनएसडीसी यांच्या सहकार्याने इस्रायलमध्ये होम-बेस्ड केअरगिव्हर पदांसाठी भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील उमेदवारांना ही मोठी रोजगाराची संधी असून एकूण ३५०० पदे उपलब्ध आहेत. या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा अंदाजे २ लाखापर्यंत वेतन मिळू शकते. इस्रायलमध्ये प्रशिक्षित केअरगिव्हरची मोठी मागणी असल्यामुळे भारतीय उमेदवारांना प्राधान्य दिले जात आहे.

पात्रता निकषांनुसार उमेदवारांचे वय २५ ते ४५ वर्षे दरम्यान असावे. किमान १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. उमेदवाराकडे किमान ३ वर्षे वैध पासपोर्ट असावा, तसेच इंग्रजी भाषेचे मूलभूत ज्ञान आवश्यक आहे. शारीरिकदृष्ट्या सक्षम असणे गरजेचे असून उंची किमान ४.५ फूट आणि वजन किमान ४५ किलो असावे.

उमेदवारांनी केअरगिव्हिंग क्षेत्रातील किमान ९९० तासांचे प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे आणि ते प्रशिक्षण भारतीय मान्यताप्राप्त संस्थेकडून घेतलेले असणे आवश्यक आहे. GDA (General Duty Assistant), Home Health Aide, किंवा तत्सम कोर्स केलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. महिलांसाठी ८० टक्के आणि पुरुषांसाठी २० टक्के पदे राखीव आहेत. निवड प्रक्रिया इस्रायली नियोक्त्यांकडून केली जाणार असून भारत सरकार किंवा एनएसडीसी हे नियोक्ता म्हणून कार्य करणार नाहीत. एनएसडीसी केवळ सुविधा पुरवणारी संस्था म्हणून काम करेल. निवड झाल्यानंतर कामासाठी इस्रायलमध्ये जाताना कुटुंबियांना (पती, पत्नी किंवा मुले) सोबत नेण्याची परवानगी असणार नाही.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी अधिक माहितीसाठी आणि अर्ज प्रक्रियेसाठी https://maharashtrainternational.com/jobdetail.aspx किंवा या कार्यालयाशी प्रत्यक्ष अथवा दत्तात्रय कांबळे मो. क्र. ९०२८२३८४६५ संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी इच्छुकांनी लवकरात लवकर अर्ज करून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गर्शन केंद्राचे सहायक आयुक्त निशांत सूर्यवंशी यांनी केले आहे.

## महाराष्ट्र दिनाच्या कार्यक्रमात पालकमंत्री, खासदार, आमदारांना फेटे बांधले नाही चार कर्मचारी निलंबित

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** महापालिकेच्या वतीने १ मे महाराष्ट्र दिनी आयोजित भूमिपूजन कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे नेते, नगरसेवक तथा अधिकारी यांना फेटे बांधले नाही या कारणास्तव महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी युद्धीष्टर रैंच, भांडार प्रमुख सिद्धिकी अहमद या दोघांना तर याच दिवशी ध्वजारोहण कार्यक्रमासाठी कार्यालय वेळेत उघडले नाही आणि दारू पिऊन असल्याच्या कारणाने महापौर व उपमहापौर यांच्या कक्षावरील दोन शिपाई अशा चौघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने महापालिका वतुर्ळात खळबळ उडाली आहे. महाराष्ट्र दिन १ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या गिरणार चौकातील अश्वारूढ पुतळा उभारण्याच्या कामासाठी चबुतऱ्याच्या भूमिपूजनाचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला पालकमंत्री डॉ.अशोक ऊईके, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार किशोर जोरगेवार, महापौर संगीता खांडेकर, उपमहापौर प्रशांत दानव, स्थायी समिती सभापती मनस्वी गिरे तथा सर्वपक्षाचे नगरसेवक तसेच जिल्हाधिकारी पंत, आयुक्त अकनुरी नरेश यांच्यासह प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## भिसेवाघोली येथील भिसे कुटुंबीयाचे आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून सांत्वन

**लातूर/प्रतिनिधी** :लातूर तालुक्यातील मौजे भिसेवाघोली येथील कै. मगणराव भिसे पाटील आणि कै. बन्सी गोविंद भिसे यांचे नुकतेच निधन झाले. लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी या दोन्ही भिसे परिवाराची भेट घेवून सांत्वन केले.

कै. मगणराव भिसे पाटील आणि कै. बन्सी गोविंद भिसे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच दुःखद निधन झाले सदरील दोन्ही भिसे कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी मंगळवारी भिसेवाघोली त्यांच्या निवासस्थानी जाऊन दिवंगत मगणराव भिसे पाटील आणि दिवंगत बन्सी भिसे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी आ. रमेशअप्पा कराड यांनी राजाभाऊ मगनराव भिसे, आप्पासाहेब मदनराव भिसे, दीपक मगनराव भिसे आणि विकास बन्सी भिसे, दीपक बन्सी भिसे या दोन्ही कुटुंबातील सदस्यांशी चर्चा करून सांत्वन केले.



यावेळी आ. कराड यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिप सदस्य महादेव साळुंके, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवतराव सोट, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, दिपक वांगसकर, पद्माकर चिंचोलकर, मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, विश्वास कावळे, सतिश अंबेकर, ॲड. धनराज शिंदे, योगीराज साखरे, बाबासाहेब भिसे, अंकुश गणगे, शुभम खोसे यांच्यासह भिसेवाघोली येथील इतर अनेक जण होते.

## खारघर येथे भा. बौ. महासभेच्या वतीने संयुक्त जयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई / के. एच. हनवते :** भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हाअंतर्गत तथागत महाविहार सेक्टर - १२ खारघर शाखेच्या वतीने शाखेचे अध्यक्ष नवनाथ पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३ /०५/ २०२६ रोजी तथागत भगवान गौतम बुद्ध, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठया हर्षोल्हासात साजरी करण्यात आली. तसेच याप्रसंगी भारतीय भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस संजय झणके गुरुजी कोषाध्यक्ष प्रकाश माने गुरुजी तसेच संस्कार उपाध्यक्ष प्रकाश भालेराव गुरुजी यांच्या हस्ते धम्मध्वजारोहन करण्यात आले. तसेच सामूहिक धम्म वंदना घेऊन महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना दिली. आदर्शांची पुजा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सामुहिक त्रिसरण घेण्यात आले. उपस्थित महाराष्ट्र व जिल्हा पदाधिकारी व इतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले, भारतीय बौद्ध महासभा



महाराष्ट्र राज्य शाखेचे कार्यालयीन सचिव बापूसाहेब निकाळजे ( केंद्रिय शिक्षक ) यांनी महामानवांचे क्रांतिकारी विचार आणि संविधान या विषयावर अप्रतिम प्रवचन दिले, त्यांच्या प्रवचनामुळे व चांगल्या प्रभावशाली शैलीमुळे उपासक / उपासिका भारावुन गेले, या कार्यक्रमासाठी भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष यु . जी . बोराडे गुरुजी सुद्धा आवर्जुन कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांनी शाखा पदाधिकाऱ्यांची स्तुती केली . चांगले विचार व्यक्त करून कार्यक्रमात नव्या पिढीला तरुण आणि तरुणींना भारतीय बौद्ध महासभेमध्ये येण्याचे आव्हान व मार्गदर्शन केले. तसेच या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन मा. प्रकाश यशवंते यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शाखेचे सर्व पदाधिकारी अध्यक्ष आयु . नवनाथ गहीनाथ पवार सरचिटणीस आयु .प्रकाश दशरथ यशवंते कोषाध्यक्ष आयुनि. वर्षाताई शिंदे (उपाध्यक्ष - संस्कार विभाग ) आर .बी . भारती कौडीन्य बौद्ध (संस्कार -सचिव ), आयुनि. सुमनताई वानखेडे आयुनि. पंचफुलाताई अंभोरे (संरक्षण सचिव )आयु. प्रभाकर चंदनशिव आयु. अजय विजय गायकवाड (पर्यटन सचिव ) आयुनि. तारामतीताई रामदास पवार आयुनि. नीताताई राजेंद्र जाधव (कार्यालयीन सचिव ) आयु . आर . टी . पवार हिशोब तपासणीस आयु .प्रदीप नामदेव गायकवाड (संघटक ) आयु . किरण चोरपगार, सुशीलाताई. पवार, शांताताई माघाडे, उषाताई बोदडे, शांताताई हराळे सुनीताताई जावळे, गयाबाई खंडागळे, नम्रताताई शेवडे, वंदनाताई सोनवले, ऊर्मिलाताई उदागे, वंदनाताई माने, माधुरीत्ताई भारती, सरुताई गायकवाड, रामकिसन हराळे, सुरेखाताई कांबळे, किरणताई वानखेडे आयु .अशोक भारती , आयु. गुलाब भारती आयु . रवि भारती आयु हिरालाल भारती आयु. सुमित भारती, संगीताताई निकाळजे, राधाताई जाधव, रसिकाताई वाघमारे, वैशालीताई कांबळे, शुभांगीताई जगताप यांनी सहकार्य केले . कार्यक्रमाचे अध्यक्ष: नवनाथ पवार गुरुजी भारतीय बौद्ध महासभा शाखा खारघर यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. सर्व उपस्थित धम्म उपासक उपासिका मान्यवर कार्यक्रम यशस्वी करण्याऱ्या व सहकार्य करणाऱ्या सर्वांचे हार्दिक आभार व्यक्त केले. , शेवटी सरणत्तय घेवुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. आणि उपस्थित सर्वांनी सहभोजनाचा आनंद घेतला.

संपादकीय...

## भारत-ऑस्ट्रियामध्ये विविध करारांवर स्वाक्षऱ्या

ऑस्ट्रिया हा देश युरोपमध्ये भू-राजनैतिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा देश आहे. ऑस्ट्रियाने सदैव महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्ट्रियाला भेट दिली होती. त्यानंतर ऑस्ट्रियाचे चान्सलर हे चार दशकाच्या कालावधीनंतर प्रथमच भारत भेटीवर आले होते. त्यामुळे दोन्ही देशातील उबदार संबंधांचे महत्त्व लक्षात घेता हा दौरा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विशेषतः भारत आणि युरोपियन युनियन दरम्यान झालेल्या व्यापारी करारानंतर सर्व युरोपीय देश भारताबरोबर सहकार्य करण्यासाठी आणि आर्थिक व राजकीय संबंध मजबूत करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यापैकी ऑस्ट्रिया हा एक प्रमुख देश असून, तेथे कुलपती किंवा चान्सलर हे अत्यंत महत्त्वाचे राजकीय पद मानले जाते. त्यामुळे त्यांच्या भेटीचे वैशिष्ट्यापूर्ण स्थान लक्षात घेता विशेष महत्त्व दिले जात आहे. ऑस्ट्रियाचे कुलपती किंवा चान्सलर डॉ. ख्रिश्चन स्टॉकर यांची १६ ते २० एप्रिल ही चार दिवसांची भारत भेट राजकीय संबंधांना कलाटणी देणारी ठरली. या भेटीदरम्यान दोन्ही देशांनी संरक्षण तंत्रज्ञान आणि सुरक्षेसह १५ महत्त्वाच्या विषयांवर सामंजस्य करारांना अंतिम रूप दिले आहे व त्यावर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत. पंतप्रधान मोदींनी स्टॉकर यांच्या या दौऱ्याला चार दशकानंतरचा अत्यंत महत्त्वाचा दौरा, असे म्हटले आहे. त्यांचे हे मत अर्थपूर्ण असून, तेवढेच भू-राजनैतिक दृष्टीने संबंध अधोरेखित करणारे आहे. संमत झालेल्या १५ करारांमध्ये काही महत्त्वाच्या करारांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्यामध्ये प्रामुख्याने दोन्ही देशाने संरक्षण स्टार्टअप, हायटेक तंत्रज्ञान, कृत्रिम प्रज्ञा आणि नवीकरणीय ऊर्जा तसेच सायबर सुरक्षा आणि उच्च शिक्षण संशोधन या क्षेत्रात सहकार्य वाढविण्याचे ठरविले आहे. या भेटीच्या प्रमुख उपलब्धी कोणत्या क्षेत्रामध्ये असतील तर त्या व्यापार आणि तंत्रज्ञानात आहेत. उभय देशातील द्विपक्षीय व्यापार वाढविण्यावर भर देण्यात आला आहे तसेच भागीदारी अंतर्गत प्रगत तंत्रज्ञानाची देवाण-घेवाण आणि सहकार्यावर विशेषत्वाने नवी मांडणी करणारे आहे, असे करताना ऑस्ट्रिया हा भारताचा टनेलिंग पार्टनर म्हणून उदयास येत आहे. भारतामध्ये कठीण पर्वतामध्ये बोगदा निर्मिती करण्याचे काम असो तसेच डिजिटल नव प्रज्ञाशोध आणि अक्षय ऊर्जा तंत्रज्ञानाचा विस्तार करण्याचे काम असो तसेच खनिजे उत्पादन शोध याबाबतीत ऑस्ट्रियाच्या सहकार्यामुळे विशेष क्षमता वाढविण्यात येणार आहेत. भारतामध्ये बोगदा निर्मिती क्षेत्रातील प्रगत ऑस्ट्रियन तंत्रज्ञान वापरले जाईल. त्यामुळे अनेक दुर्गम रस्त्यांमध्ये बोगदे तयार करण्याची सध्याच्या कालखंडात क्रिया सुलभ होणार आहे. सध्याच्या कालखंडात ऑस्ट्रियाच्या १६० कंपन्या भारतामध्ये गुंतवणूक करत आहेत व विविध उत्पादनांत सहकार्य नोंदवित आहेत. या भेटीदरम्यान भारत-ऑस्ट्रिया व्यापारी सहकार्य शिखर बैठकीचे उद्घाटन करण्यात आले आहे, ही गोष्ट सुद्धा तेवढीच महत्त्वाची आहे. त्यामुळे पुढील आर्थिक सहकार्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे. आधुनिक जगामध्ये भारताचा उदय कौशल्य राजधानी म्हणून झाला आहे. दरवर्षी एक कोटी अभियंते भारतामध्ये निर्माण होत आहेत. त्यांच्या सेवासाठी संधी म्हणून आता सबंध जग हे एक नवे क्षितिज म्हणून उदयास आले आहे. ऑस्ट्रिया हा देश सुद्धा त्याला अपवाद नाही. भारत-युरोपियन संघामध्ये व्यापारी करार झाल्यानंतर आता सर्व युरोपीय देश भारताशी सहकार्य करण्यासाठी उत्सुक आहेत. ऑस्ट्रिया सुद्धा त्यास अपवाद नाही. युरोपियन देश भारताकडे जगाची कौशल्य राजधानी म्हणून मोठ्या आशेने पाहत आहेत. कारण युरोपातील बहुतेक सर्व देशांमध्ये एकतर लोकसंख्या कमी आहे, दुसरे म्हणजे प्रगत मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे जर्मनीपासून ऑस्ट्रियापर्यंत अनेक देशांना भारताचे संबंध वाढवून येथील प्रगत मनुष्यबळाचा त्यांच्या औद्योगिक विकासात उपयोग करावयाचा आहे. या दृष्टीने भारत ऑस्ट्रिया दरम्यान मोबिलिटी आणि स्किल म्हणजे कौशल्य विकास आहे. त्या संदर्भात अनेक महत्त्वाची पावले टाकण्यात आली आहेत. २०२३ मधील स्थलांतर कराराचा एक भाग म्हणून ऑस्ट्रियामधील उद्योग क्षेत्रात आता भारतीय तरुणांना मोठा वाव आहे. संधींचा विस्तार करून अलीकडे अनेक नव्या क्षेत्रांत भारतीय पावले टाकत आहेत. विशेषतः नर्सिंग क्षेत्रात गतिमानता वाढवण्यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी आरोग्य सेवा क्षेत्रात विशेष सहकाऱ्यांची बैठक झाली. ऑस्ट्रियाच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने विविध क्षेत्रांत भारताच्या सहकार्याबद्दल केलेली चर्चा ही खरोखर फलदायी ठरली आहे. ऑस्ट्रियाबरोबर संमत झालेल्या १५ करारांमुळे भारतासाठी नव्या संधी खुल्या झाल्या आहेत तसेच त्यामुळे नवी आव्हानेही निर्माण झाली आहेत. व्यापार, तंत्रज्ञान तसेच स्टार्टअप सेमीकंडक्टर या उद्योगातील सहकार्याबरोबरच नवी आव्हाने सुद्धा त्यामुळे निर्माण होत आहेत. त्यांना सामोरे जाण्यासाठी दोन्ही देशांनी भक्कम तयारी केली पाहिजे. ऑस्ट्रियाच्या कुलपतीबरोबर आलेले ४० सदस्यांचे शिष्टमंडळ सर्व पैलूंचा बारकाईने अभ्यास करून करारांना अंतिम रूप देत आहेत, ही समाधानाची बाब होय. ही भागीदारी उभय देशांमध्ये एक नवा मैलाचा दगड ठरली आहे. कुलपती स्टॉकर यांनी सत्ता हाती घेतल्यानंतर आशियातील पहिली पसंती भारताला, असे त्यांनी आग्रहाने नमूद केले.भारत आणि ऑस्ट्रिया दरम्यान संरक्षण उत्पादन क्षेत्रात तसेच प्रगत तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये लष्करी सहकार्य वाढविण्यावर भर दिला जात आहे. या संदर्भात एका सामंजस्य करारावर सह्या करण्यात आल्या. त्यानुसार प्रगत तंत्रज्ञान हस्तांतरण, सायबर सुरक्षा आणि स्टार्टअप उद्योग यासंदर्भात करार करण्यात आले आहेत. संरक्षण क्षेत्रातील भारतीय उत्पादने जगात कमालीची लोकप्रिय होत आहेत. भारतीय क्षेपणास्त्रऽ, लढाऊ विमाने यांना जगभर चांगली मागणी येत आहे. हे पाहून ऑस्ट्रिया सुद्धा भारताकडून अशी प्रगत शस्त्रऽ घेण्यासाठी वचनबद्ध आहे.

# जागतिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करुन प्रगती केल्यास भारत महासत्ता बनेल..! - माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर

**लातूर/प्रतिनिधी :** जगामध्ये विविध क्षेत्रात आश्चर्यकारक बदल घडत आहेत. ए.आय. विविध क्षेत्रात मानवापेक्षा मोठ्या गतीने परिवर्तन घडवत आहे. रोबोटेक, सौरऊर्जा, इलेक्ट्रिकल व्हेईकल बदलाचा स्वीकार भारत देश मोठ्या प्रमाणावर करत आहे. जगात सर्वाधिक तरुण व हुशार तरुण भारतात आहेत. त्यांच्या कार्यातून भारत महासत्ता बनेल, असे अभ्यासपूर्ण विचार माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी मांडले.






यावेळी ते शिवाजी विद्यालय बिटरगाव ता. रेणापूर जि. लातूर या शाळेचे मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांच्या हॉटेल वैष्णव, नवीन रेणापूर नाका, लातूर येथे आयोजित सेवापूर्ती गौरव सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला जेएसपीएम शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शिक्षणाधिकारी संजय क्षिरसागर, उपशिक्षणाधिकारी सुशिल फुलारी, मुख्य लेखा अधिकारी शिक्षण विभाग संतोष धुमाळे, वेतन अधीक्षक श्री मदनराव हगवणे पाटील, नगरसेविका आदितीताई अजित पाटील कव्हेकर, नगरसेविका सत्यवती चेवले, संगिता चव्हाण, जेएसपीएम समन्वयक बापूसाहेब गोरे, अप्पासाहेब पाटील, अनिरूध्द पाटील, विनोद जाधव, इंजि.वेदिका चव्हाण, डॉ वैभवी चव्हाण, हंसराज देशमुख, विष्णू पाटील, आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ. कव्हेकर म्हणाले की, अद्यावत फ ेसबुक, आयटीमुळे विद्यार्थ्यांना बरीच माहिती मिळते. त्यामुळे त्यांच्या पुढे जाऊन त्यांना अभ्यासक्रमापेक्षा पुढचे ज्ञान दिले पाहिजे. सध्याच्या काळात पदवीपेक्षा विशिष्ट विषयामध्ये ज्ञान असणे हे महत्त्वाचे आहे. त्याचा स्विकार करून आपण तरुणांना घडविले पाहिजे.

जेएसपीएम संस्थेला मा. राज्यपालांच्या हस्ते नवभारत सीएसआर अवार्ड महाराष्ट्रामध्ये शिक्षण क्षेत्रात गौरवपूर्ण कार्य केल्यामुळे महाराष्ट्राचे राज्यपाल मा.सी.पी.राधाकृष्णन यांच्या शुभहस्ते मुंबई येथील कार्यक्रमात नवभारत टाईम्सच्यावतीने नवभारत सीएसआर अवार्ड देण्यात आला आहे. तसेच माझ्या व सौ.प्रतिभा पाटील यांच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील केलेल्या कार्यामुळे यशवंत-वेणू हा पुरस्कार देऊन ज्येष्ठ साहित्यिक तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांच्याहस्ते सन्मानीत करण्यात आले आहे.

मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण यांचे कार्य गौरवास्तपद आहे. त्यांनी ३१ वर्षे धाडसाने निस्पृहपणे कार्य केले. त्यामुळे शाळेच्या प्रगतीमध्ये विविध अवार्ड मिळाले अमेरिका देशाच्या प्रतिनिधींनी शिवाजी विद्यालय बिटरगाव या शाळेला भेट देऊन गौरव केला, हे श्री. सूर्यकांत चव्हाण यांच्या कार्यामुळे घडले आहे. असे मतही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी यावेळी बोलताना मांडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा सन्मान संयोजन समितीच्यावतीने करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका अरूणा कांदे यांनी केले. प्रारंभी मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण व संगिता चव्हाण यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार अब्दुल गालिब शेख यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला जेएसपीएम संस्थेतील सर्व युनिटप्रमुख, शिक्षक, शिक्षिकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सेवानिवृत्तीनंतरही चव्हाण सरांनी संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे- अजित पाटील कव्हेकर जेएसपीएम संचालित शिवाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण हे ३१ वर्षांच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळामध्ये शिवाजी विद्यालय व जेएसपीएम संस्थेसाठी मोठे योगदान दिलेले आहे. तसेच कव्हेकर परिवाराच्या पाठीशी राहण्याचे कार्यही त्यांनी केलेले आहे. जेएसपीएम संस्थेच्या वाटचालीमध्ये योगदान दिल्यामुळे साहेबांच्या मार्गदर्शनाखाली जेएसपीएम संस्थेतील विद्यार्थी संख्या ७ विद्यार्थ्यांवरून २२ हजार विद्यार्थ्यांवर गेलेली आहे. संस्थेच्या प्रगतीसाठी सतरा-अठरा तास काम करणाऱ्या माजी आ.कव्हेकर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली चव्हाण सरांनी कुटुंबासाठी पुरेसा वेळ न देता संस्थेच्या वाटचालीसाठी त्यांनी मोठे योगदान दिलेले आहे. त्यामुळे सेवानिवृत्तीनंतरही चव्हाण सरांनी संस्थेच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे अवाहन जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले

## मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी लातूर तालुक्यात विशेष मोहीम; मतदारांनी मॅपिंग प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी आणि पारदर्शकता जपण्यासाठी लातूर तालुक्यात विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. सन २००२ च्या मतदार यादीशी सध्याच्या मतदारांचे मॅपिंग (पडताळणी) करणे अनिवार्य असून, ज्या मतदारांचे मॅपिंग पूर्ण होणार नाही, त्यांना भविष्यात मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोर सुनावणीला सामोरे जावे लागू शकते. ही प्रक्रिया टाळण्यासाठी मतदारांनी तातडीने आपली पडताळणी पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. लातूर जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या आदेशानुसार ही मोहीम २४ एप्रिल २०२६ ते ९ मे २०२६ या कालावधीत राबवली जात आहे. या कामासाठी तालुक्यातील सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) आणि पर्यवेक्षकांना पूर्णवेळ नियुक्त करण्यात आले असून त्यांना इतर कामांतून कार्यमुक्त करण्यात आले आहे. सर्व बीएलओ दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत संबंधित मतदान केंद्रावर उपलब्ध असतील. याव्यतिरिक्त इतर वेळेत ते घरोघरी जाऊन मतदारांची भेट घेणार आहेत. पडताळणीसाठी मतदारांनी आपले मतदार ओळखपत्र सोबत ठेवणे आवश्यक आहे. २००२ मधील मतदारसंघ, मतदार यादी भाग क्रमांक आणि अनुक्रमांक या आधारे ही पडताळणी केली जाईल. ज्यांचे नाव २००२ च्या यादीत नाही परंतु नंतर नोंदवले गेले आहे, अशा मतदारांची पडताळणी त्यांच्या आई-वडील किंवा आजी-आजोबांच्या नावाच्या आधारे केली जाईल.

पश्चिम बंगाल आणि तमिळनाडू या राज्यांनंतर आता महाराष्ट्र राज्यात ही मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे. मतदारांनी आपले ब्लर फोटो (अस्पष्ट फोटो) अद्ययावत करण्यासाठी आणि डीएसई नोंदींच्या पडताळणीसाठी प्रशासनाला सहकार्य करावे. मतदारांनी ही मॅपिंग प्रक्रिया वेळेत पूर्ण करून घ्यावी, जेणेकरून भविष्यातील तांत्रिक अडचणी टाळता येतील, असे आवाहन लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे आणि तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

## राज्यसभेसाठी माझा आग्रह नाही, पक्ष जो निर्णय घेईल, तो अंतिम असेल- छगन भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर राज्यसभेचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवरून पक्षात चढाओढ सुरू असतानाच, ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी या शर्यतीतून स्वत:ला दूर ठेवले आहे. ''मी सध्या राज्यात ज्येष्ठ मंत्री म्हणून काम पाहत असून राज्यसभेवर जाण्यासाठी माझा कोणताही आग्रह नाही,'' असे त्यांनी गुरुवारी स्पष्ट केले.



सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर कोणाची वर्णी लागणार, याबाबत राष्ट्रवादीत अंतर्गत स्पर्धा रंगली असतानाच भुजबळांचे हे विधान महत्त्वाचे मानले जात आहे. छगन भुजबळ म्हणाले की, ''मी सध्या राज्यात ज्येष्ठ मंत्री म्हणून काम पाहत आहे. माझ्याकडे मंत्रिपदाची जबाबदारी असल्याने राज्यसभेवर जाण्यासाठी आग्रह धरणे चुकीचे आहे. या जागेबाबत अद्याप पक्षात कोणतीही अधिकृत चर्चा झालेली नाही. पक्ष जो निर्णय घेईल, तो अंतिम असेल''. असेही ते म्हणाले.

नव्या चेहऱ्याला संधी मिळणार?

सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यानंतर आता राज्यसभेत राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल, पार्थ पवार आणि नितीन पाटील हे तीनच खासदार उरले आहेत. रिक्त झालेल्या जागेसाठी पक्षातील अनेक नेत्यांनी रस दाखवल्याने नेतृत्व कोणावर विश्वास दाखवणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. या नियुक्तीचा परिणाम आगामी राजकीय समीकरणांवर होण्याची शक्यता असल्याने पक्ष अत्यंत सावधगिरीने पावले टाकत आहे.

# सीबीएसईचा वाढता प्रभाव: पालक आपल्या मुलांसाठी हा अभ्यासक्रम का निवडत आहेत

भारताच्या शैक्षणिक क्षेत्राला नव्याने आकार देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण प्रवाहात, अधिकाधिक पालक आपल्या मुलांसाठी केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सी.बी.एस.ई.) अभ्यासक्रमाची निवड करत आहेत. हा बदल २१ व्या शतकातील आव्हानांसाठी विद्यार्थ्यांना तयार करण्यामध्ये सी.बी.एस.ई. प्रणालीद्वारे मिळणाऱ्या फायद्यांना मिळत असलेल्या वाढत्या मान्यतेचे द्योतक आहे. आपल्या संरचित दृष्टिकोनासाठी आणि सर्वसमावेशक अभ्यासक्रमासाठी ओळखला जाणारा सी.बी.एस.ई. अभ्यासक्रम, शैक्षणिक कठोरता आणि व्यावहारिक कौशल्ये यांचा मेळ घालणाऱ्या संतुलित शिक्षणाच्या शोधात असलेल्या पालकांमध्ये लोकप्रिय झाला आहे. जागतिक अर्थव्यवस्था विकसित होत असताना आणि तांत्रिक प्रगतीमुळे नोकरीच्या बाजारपेठांचे स्वरूप बदलत असताना, पालक आपल्या मुलांना एक असा भक्कम पाया देण्यास उत्सुक आहेत, जो चिकित्सक विचार, सर्जनशीलता आणि अनुकूलनक्षमतेला प्रोत्साहन देईल.

### सी.बी.एस.ई. शाळांची वाढती लोकप्रियता

अलीकडील आकडेवारीनुसार, शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागांतील सी.बी.एस.ई.-संलग्न शाळांमधील प्रवेशांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. शिक्षण मंत्रालयाच्या मते, गेल्या दशकात सी.बी.एस.ई. शाळांची संख्या २०% पेक्षा जास्त वाढली आहे. अनेक पालक यामागे अभ्यासक्रमाचे राष्ट्रीय शैक्षणिक मानकांशी असलेले सरेखन आणि सर्वांगीण विकासावर असलेला भर ही कारणे देतात. ''सीबीएसई सर्वांगीण शिक्षण देते, जे विद्यार्थ्यांना आयआयटी-जेईई आणि नीट यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांसाठी तयार करते,'' असे दिल्लीतील एक पालक, रमेश कुमार म्हणतात. ''आमचा विश्वास आहे की हा अभ्यासक्रम केवळ शैक्षणिक बाबींवरच लक्ष केंद्रित करत नाही, तर अभ्यासेतर उपक्रमांनाही प्रोत्साहन देतो, जे सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.''

### लवचिकता आणि सुलभता

या प्रवृत्तीमागील एक प्रमुख घटक म्हणजे सीबीएसई अभ्यासक्रमाची लवचिकता आणि सुलभता. सर्व शाळांमध्ये एकसमान अभ्यासक्रम असल्यामुळे, पालक खात्री बाळगतात की त्यांच्या मुलांना त्यांच्या भौगोलिक स्थानाची पर्वा न करता, सातत्यपूर्ण दर्जाचे शिक्षण मिळेल. याव्यतिरिक्त, सीबीएसई अभ्यासक्रमानुसार तयार केलेली ऑनलाइन संसाधने आणि कोचिंग सेंटर्सच्या उपलब्धतेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासात उत्कृष्ट कामगिरी करणे सोपे झाले आहे. शिवाय, सीबीएसई शाळांमध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि डिजिटल शिक्षण साधनांच्या परिचयामुळे शिकण्याचा अनुभव अधिकच वाढला आहे. बोर्डाने अनुभवात्मक शिक्षण, प्रकल्प-आधारित मूल्यमापन आणि तंत्रज्ञानाच्या एकात्मतेवर दिलेला भर, आपल्या मुलांसाठी प्रगतिशील शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या आधुनिक पालकांना चांगलाच भावला आहे.

### आव्हाने आणि टीका

वाढती लोकप्रियता असूनही, सीबीएसई अभ्यासक्रमात काही आव्हाने आहेतच. टीकाकारांच्या मते, पाठांतर आणि प्रमाणित चाचण्यांवर जास्त भर दिल्याने सर्जनशीलता आणि चिकित्सक विचारशक्ती खुंटू शकते. काही शिक्षणतज्ज्ञ अधिक संतुलित दृष्टिकोनाचे समर्थन करतात, ज्यात विविध शिक्षण पद्धतींचा समावेश असतो आणि स्वतंत्र विचारांना प्रोत्साहन दिले जाते. अशा चिंतांना प्रतिसाद म्हणून, सी.बी.एस.ई. ने परीक्षांचा भार कमी करण्याच्या आणि अधिक विद्यार्थी-केंद्रित दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सुधारणा सुरू केल्या आहेत. सातत्यपूर्ण सर्वसमावेशक मूल्यमापन () ही एक अशीच उपाययोजना आहे, जी केवळ महत्त्वाच्या परीक्षांवर अवलंबून न राहता, नियमित प्रतिसादाद्वारे विद्यार्थ्यांच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी तयार करण्यात आली आहे.

### भविष्यातील शक्यता




जसजसे आपण २१ व्या शतकात पुढे जात आहोत, तसतशी दर्जेदार शिक्षणाची मागणी वाढतच आहे. जागतिकीकरण आणि तांत्रिक प्रगतीमुळे करिअरचे स्वरूप बदलत असल्याने, पालक अधिकाधिक अशा शैक्षणिक मार्गांची निवड करण्याकडे झुकत आहेत, जे अनुकूलता आणि प्रासंगिकता यांचे आश्वासन देतात. सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाकडे होत असलेला हा बदल एका व्यापक सामाजिक बदलाचे प्रतिबिंब आहे, जिथे शिक्षणाला मुलाच्या भविष्यातील एक महत्त्वपूर्ण गुंतवणूक म्हणून पाहिले जाते. जसजसे अधिकाधिक कुटुंबे हा ट्रेंड स्वीकारतील, तसतसे सतत बदलणाऱ्या जगात वावरण्यास सज्ज असलेल्या पिढीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शैक्षणिक संस्था कशा प्रकारे जुळवून घेतात आणि विकसित होतात, हे पाहणे मनोरंजक ठरेल. थोडक्यात, सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाला वाढती पसंती केवळ शैक्षणिक निवडीतील बदलच नव्हे, तर आधुनिक जीवनातील गुंतागुंतीला सामोरे जाण्यास तयार असलेल्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वांचे संगोपन करण्याची वचनबद्धता देखील दर्शवते. पालक दर्जेदार शिक्षणाला प्राधान्य देत असल्याने, देशभरातील सीबीएसई शाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल दिसत आहे.

**ॲड. विराज उत्तमराव माकणीकर.**
**बी एस एल; एल एल एम;**
**एम.ए.अर्थशास्त्र; बी.एड.**

## संक्षिप्त...

### अहमदाबाद गुजरात या ठिकाणी होणाऱ्या जागतिक योगासन चॅम्पियनशिपचे हिंदवी चौरे करणार हिंदुस्थानचे नेतृत्व



**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील जीवाचीवाडी गावची हिंदवी चौरे जागतिक योगासन चॅम्पियनशिप साठी तिची निवड झाली असुन ती सोनीपत हरियाणा या ठिकाणी एक आणि दोन मे रोजी झालेल्या नॅशनल योगासना ट्रायल मधून १४ वर्षे वयोगटातून हिंदवी चौरे हिने फॉरवर्ड बेंडिंग योगासना प्रकारामधून प्रथम क्रमांक पटकावून पहिली वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिप ठरली आहे.तर तिच्या या कार्याची दखल घेऊन तिला येत्या ४ जून ते ८ जून २०२६ रोजी अहमदाबाद गुजरात या ठिकाणी होणाऱ्या स्पर्धेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे तरी तिच्या या कार्यामुळे सर्व स्तरातून तिचे कौतुक केले जात आहे.

हिंदवी चौरे हि एका गरीब कुटुंबात जन्मलेली मुलगी आज देशाच नेतृत्व करणार आहे हिंदवी चौरे हिला चार ते पाच वर्षांची असताना आजार झाला आणि या आजारांवर मात करण्यासाठी तिच्या आई वडिलांनी तिला योगासनाचे धडे दिले आणि तिने आपल्या आजारांवर मात करून आज देशाच्या योगासन चॅम्पियन चे भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. गुजरातमध्ये जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे नेतृत्व करण्याची संधी मिळत आहे अशा जिद्दी हिंदवी चौरे या गरीब कुटुंबात जन्मलेल्या मुलीला देशाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाल्याने केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तिच्या या कामगिरीमुळे तिच्या आई वडिलांचे परिश्रम कामी आले आहे या तिच्या यशा बद्दल धन्य ते माता पिता असच मनावस वाटत यावरून असे दिसून येते की नावा प्रमाणेच हिंदवी चौरे हिला हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे.

### महाराजस्व अभियानांतर्गत ८ मे रोजी लातूरमध्ये समाधान शिबीर; एकाच छताखाली मिळणार विविध शासकीय सेवा

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत लातूर तालुक्यात लोकाभिमुख आणि गतिमान प्रशासनासाठी समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या मोहिमेतील नियोजित वेळापत्रकानुसार शुक्रवार, ८ मे २०२६ रोजी सकाळी ९ वाजता लातूर येथील गिरवलकर मंगल कार्यालयात या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी लातूर महसूल मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

लातूर तहसील कार्यालयाच्यावतीने आयोजित या शिबिरात महसूल विभागासह विविध शासकीय विभागांच्या सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यामध्ये महसूल विभागामार्फत रहिवासी दाखला, उत्पन्न दाखला, वय, अधिवास आणि जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रिमीलेअर, शेतकरी दाखला, अल्पभूधारक दाखला. तसेच डिजिटल सातबारा (क्यूआर कोडयुक्त) उतारा वितरण, प्रलंबित फेरफार निकाली काढणे आणि एक खिडकी योजनेअंतर्गत तत्काळ सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच नवीन आधार कार्ड काढणे आणि जुन्या आधार कार्डातील दुरुस्तीची सेवाही याठिकाणी उपलब्ध राहील.

पुरवठा व आरोग्य विभागामार्फत शिधापत्रिकेत नाव लावणे किंवा कमी करणे आणि आरोग्य योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्रे देणे, मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, पत्ता बदलणे किंवा दुरुस्ती करणे, कृषी विभागाची पी.एम. किसान सन्मान योजना, सामाजिक अर्थसाहाय्य मंजुरी आदेश वाटप व डीबीटी माहिती, भूमी अभिलेख विभागामार्फत क प्रत वाटप व जमीन मोजणी अर्ज स्वीकारणे आदी सेवा याठिकाणी उपलब्ध राहणार आहेत. प्रशासकीय कामात गती आणून नागरिकांचे प्रश्न स्थानिक पातळीवर सोडवणे हा या समाधान शिबिराचा मुख्य उद्देश आहे. लातूर महसूल मंडळातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे व तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

# मान्सून पूर्व स्वच्छता मोहिमेस केज नगरपंचायतच्या वतीने सुरुवात

## शहरातील सुजान नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन आपले शहर स्वच्छ व सुंदर शहर करण्यास सहकार्य करावे-डॉ.इनामदार डॉ. बनसोड

**केज/प्रतिनिधी :** केज शहरांमध्ये मान्सून पूर्व स्वच्छता मोहिमेस नगरपंचायतच्या वतीने सुरुवात करण्यात आली आहे तरी केज शहरातील सुजान नागरिकांनी स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन आपले शहर स्वच्छ व सुंदर शहर करण्यास सहकार्य करावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते डॉ.हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ. सौ.सीताताई बनसोड यांनी केले आहे.

केज नगरपंचायत च्या वतीने मान्सूनपूर्व स्वच्छता मोहिमेस बुधवार रोजी प्रभाग क्रमांक सात मधील नालंदा विद्यालया पासून श्रीफळ फोडून सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना डॉ. हरुणभाई इनामदार म्हणाले की,बुधवार व गुरुवर रोजी प्रभाग क्रमांक सात,आठ,नऊ या प्रभागामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली आहे.

सदर स्वच्छता मोहीम ही प्रभाग क्रमांक आठ मधून कळंब रोड वरील माऊली सिनेमागृह पर्यंत करून शहरातील सर्व मुख्य रस्ते व सर्व प्रभागातील मुख्य रस्त्यावरील मोठमोठ्या नाल्या व गल्लीतील छोट्या नाल्या आणि




सार्वजनिक ठिकाणचे आणि रिकाम्या परिसरातील सर्व झाडे तोडून संपूर्ण शहर स्वच्छ व सुंदर शहर करणार आहोत पावसाळ्यामध्ये पाणी तुंबून नागरिकांची गैर सोय होऊ नये व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये नागरिक पावसाळ्यात निरोगी राहावेत या संकल्पनेतून मान्सून पूर्व स्वच्छता मोहीम राबवत आहोत. नगराध्यक्षा सौ. डॉ. सीताताई बनसोड यांनी म्हटले की, सध्या उन्हाळ्याचे दिवस चालू आहेत.

यावर्षी उन्हाची अति तीव्रता असल्याने नागरिकांनी उन्हामध्ये घराबाहेर पडू नये महत्वाच्या कामासाठीच नागरिकांनी सकाळी व संध्याकाळच्या वेळी घराबाहेर पडावे व स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी. पुढे बोलताना बनसोड म्हणाले की, सध्या उन्हाची तीव्रता लक्षात घेऊन आम्ही नगरपंचायत मार्फत शहरांमध्ये नवीन ६५ बोरवेल घेतल्या आहेत नागरिकांना पाणी कमी पडणार नाही याची आम्ही काळजी घेत आहोत त्याचबरोबर पावसाळाही जवळ आला असल्याने नागरिकांची गैर सोय होऊ नये म्हणून केज नगरपंचायत मार्फत मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम राबवत आहोत.

या मोहिमेत केज शहरातील सुजाण नागरिकांनी सहभागी होऊन आपला परिसर व शहर स्वच्छ करण्यासाठी सहकार्य करावे आपले शहर सुंदर शहर राहण्यासाठी नागरिकांनी शहरातील मुख्य रस्त्यावर व परिसरातील रिकाम्या जागेवर घरातील कचरा न टाकता घंटागाडी मध्ये टाकावा जर एखाद्या प्रभागांमध्ये घंटागाडी न आल्यास आमच्याशी संपर्क साधावा तात्काळ त्या ठिकाणी घंटागाडीची सोय केली जाईल.

आपण जर आपले घर, आपला परिसर आणि आपले शहर स्वच्छ ठेवले तर आपले आरोग्य निरोगी राहील. त्यासाठी सर्व सुजाण नागरिकांनी या स्वच्छता मोहिमेत सहभागी होऊन आपला परिसर आणि आपले शहर स्वच्छ करण्या स सहकार्य करावे असे आवाहन गटनेते डॉ.हरूणभाई इनामदार व नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड यांनी केले आहे.

# साहित्यिक उत्तम तरकसे हे एक अजब रसायन आहे..! -अभिनेता शंकरशन कराडे






पुणे एरंडवणे:- पुणे डी पी रोड म्हात्रे ब्रिज एरंडवणे पुणे येथील सिद्धी बॅकवेटच्या सभागृहामध्ये समाजभूषण जेष्ठ साहित्यिक कवी विचारवंत मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला पुणे महानगरपालिकेच्या (मराठी भाषा संवर्धन विभाग) व महाराष्ट्र राज्य शासनाची प्रशासकीय वर्ग एक व दोनच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणारी यशदा प्रशिक्षण संस्था तसेच संवाद च्या वतीने सर्व विभागातील शासकीय सेवेतील साहित्यिकांच्या साहित्याला दरवर्षी दिला जाणारा मानाचा व प्रतिष्ठेचा उत्कृष्ट साहित्य पुरस्कार हा यंदाचा म्हणजे २०२६ चा उत्कृष्ट साहित्य कलाकृती वाङ्मयीन पुरस्कार साहित्यिक उत्तम तरकसे यांच्या करपली भाकर या कथासंग्रहाला मिळाल्याने साहित्यिक श्री उत्तमराव तरकसे यांना व त्यांच्या चाहत्यांना जो आनंद झाला तोच आनंद महोत्सव साजरा करण्याकरिता सदर कार्यक्रमास झी मराठी वाहिनी वरील आम्ही सारे खवई(फेम) च्या माध्यमाने महाराष्ट्रातील घराघरातील स्वयंपाक घरातून सामान्यांच्या हृदयात पोहोचलेली सुप्रसिद्ध मराठी सिने नाट्य अभिनेता श्री शंकरशन कराडे यांच्या उपस्थितीत जल्लोषात साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमात सुप्रसिद्ध सिने मराठी अभिनेता शंकरशन कराडे हे आपल्या मनोगतात साहित्यिक उत्तमराव तरकसे यांचे कौतुक करताना म्हणाले की साहित्यिक उत्तमराव तरकसे हे एक अजब रसायन आहे ते आतून एवढे शांत राहून मनाचे व शरीराचे संतुलन ठेवत ते समाधानी असतात.

खरंच मी म्हणेल कठीणातले कठीण वादळे दुःख प्रसंगाने सुद्धा त्यांचे कडून ते समाधान व ती शांतता मिळवावी,कारणे किंवा दोष नको . आणि पुस्तकावर बोलायचं झालं तर समाजातील तळागाळातील सर्वसामान्य जणांच्या अस्सल वेदना वेचून उत्कृष्टपणे मांडण्याचे काम करपली भाकर या कथासंग्रहात कथाकार उत्तम तरकसे यांनी ओ तीव केले आहे खरोखरच हे पुस्तक वाचणे आहे मी हे पुस्तक एका बैठकीत वाचून काढले आहे यापेक्षा आणखीन काय बोलावे अशाप्रकारे आनंद उत्सव साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रमास पुणे मुंबई रायगड ठाणे नवी मुंबई अहमदनगर सांगली सातारा कोल्हापूर या परिसरातून खूप मोठ्या प्रमाणात साहित्यिकांनी हजेरी लावल्याने सभागृह अगदी खचून भरला होता कार्यक्रमाची सुरुवात संविधानाच्या पूजेनाने करून कार्यक्रमाच्या शेवटी साहित्यिक उत्तम तरकसे यांनी सर्व उपस्थित अतिथी व रसिक साहित्यिक प्रेक्षक वर्ग यांचे जाहीर आभार मानत राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

### बारामतीत दादां ची परंपरा आता जय च्या हाती

**मुंबई/प्रतिनिधी :** अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीच्या राजकारणात निम र्ण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी आता पवार कुटुंबीयांनी कंबर कसली आहे. अजितदादांची अत्यंत लोकप्रिय असलेली 'जनता दरबारा'ची परंपरा आता त्यांचे धाकटे चिरंजीव जय पवार यांनी पुढे नेण्यास सुरुवात केली असून, बारामतीत आता नव्या 'दादां'ची सक्रियता राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहे.

अजित पवार हे बारामतीतील नागरिकांच्या समस्या जागेवरच निकाली काढण्यासाठी नियमितपणे जनता दरबार भरवत असत. प्रशासकीय अधिकाऱ्यांना जागेवरच आदेश देऊन सामान्यांची कामे मार्गी लावण्याची त्यांची कार्यशैली ही त्यांची ओळख होती. दादांच्या निधनानंतर बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विजय मिळवला असला, तरी जनसंपर्काचा हा महत्त्वाचा दुवा काहीसा विरळ झाला होता. ही उणीव भरून काढण्यासाठी जय पवार आता दर गुरुवारी बारामती येथील 'सहयोग' या निवासस्थानी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत नागरिकांच्या समस्या ऐकून घेत आहेत.

या जनता दरबारात बारामतीसह आसपासच्या तालुक्यांतील नागरिक म ोठ्या संख्येने आपल्या वैयक्तिक आणि सार्वजनिक तक्रारी घेऊन येत आहेत. जय पवार नुसते समस्या ऐकूनच घेत नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे चित्र दिसत आहे. अजितदादांच्या निधनानंतर पुन्हा एकदा 'सहयोग'वर नागरिकांची गर्दी होऊ लागल्याने कार्यकर्त्यांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

# शिंदी,गप्पेवाडी शिवारात रानडुकरांचा हैदोस; ६ शेतकऱ्यांवर हल्ला तर एकाची प्रकृती चिंताजनक

## जीवाची परवा न करता रानडुकरास विजयसिंग गोखे यांनी केले कैद

**केज/प्रतिनिधी :** केज तालुक्यातील शिंदी, गप्पेवाडी शिवारात रानडुकरांने ६ जनांना चावा घेतल्याने शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गुरुवार रोजी सकाळी ११ ते १२ वाजण्याच्या दरम्यान शेतात काम करणाऱ्या निष्पाप शेतकऱ्यांवर रानडुकरांनी प्राणघातक हल्ला चढवला असून, यात सहाजण गंभीर जखमी झाले आहेत. यातील एकाची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज तालुक्यातील शिंदी व गप्पेवाडी येथील शेतकरी नेहमीप्रमाणे आपल्या शेतात कामात व्यस्त होते. दरम्यान अचानक एका मोठ्या रानडुकरांने त्यांच्यावर झडप घातली.

हा हल्ला इतका भीषण होता की,शेतकऱ्यांना स्वतःचा जीव वाचवण्यासाठी थोडी देखील संधीही मिळाली नाही.

जखमी झालेल्या शेतकऱ्यांच्या आरडा-ओरडणे परिसरात खळबळ उडाली आणि ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळाकडे धाव घेतली.

जखमींना उपचार घेण्यासाठी तात्काळ वेगवेगळ्या रुग्णालयात हलवण्यात आले.

यामध्ये उत्तम बाबू केदार यांची प्रकृती गंभीर असुन त्यांना छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत तर अश्रूबा राजाभाऊ देशमुख व पंचफुला दिगंबर जाधव यांच्यावर स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय,अंबाजोगाई,

ज्ञानेश्र्वर बापू पोते उपजिल्हा रुग्णालय,केज,

चंद्रसिंग सखाराम पोते व फुलचंद मोहन पोते प्राथमिक आरोग्य केंद्र, विडा येथे उपचार चालू आहेत.

सदरील घटनेचे गांभीर्य ओळखून अंबाजोगाईचे ज्येष्ठ नेते तथा नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी तातडीने दखल घेत जखमींना तात्काळ वैद्यकीय सेवा मिळावी यासाठी त्यांनी रुग्णालय प्रशासनाला सूचना दिल्या आहेत.

तसेच केज तालुका भाजप अध्यक्ष संदीप पाटील आणि स्थानिक तरुणांनी वेळेवर वाहनांची सोय करून जखमींना रुग्णालयात दाखल करून वनविभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना देऊन सतत रानडुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी धारूर येथील वन अधिकारी यांनी रेस्क्यू करण्यासाठी धारूर येथील टीमला पाचारण करून रानडुकराचा कैद करत असताना विजयसिंग गोखे या तरुणाचा डुकराने चावा घेतला परंतु आपल्या जीवाची परवा न करता त्यांने रानडुकरास कैद करून त्याला जेरबंद केले. यामुळे पुढील होणारा अनर्थ टळला आहे.

वनविभाग व त्यांच्या रेस्क्यू टीमचे नागरिकांच्या वतीने संदीप पाटील यांनी आभार मानले.







## महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळेच उच्चस्थ पदावर जाऊ शकलो : माजी उपसंचालक यशवंत मानखेडकर




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरात कला, वाणिज्य, विज्ञान, समाजकार्य, व्यावसायिक अभ्यासक्रम, पदव्युत्तर शिक्षण, संशोधन केंद्र आणि बहि:स्थ शिक्षण केंद्राच्या माध्यमातून समाजातील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण देणारे महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय हे मराठवाड्यातील एकमेव महाविद्यालय आहे.

या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळेच माझ्यासारख्या सर्वसामान्य ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला क्रीडा व खेल मंत्रालय, भारत सरकारच्या महाराष्ट्र राज्याच्या नेहरू युवा केंद्राच्या उपसंचालक पदापर्यंत मजल मारता आली त्यामूळे विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२६-२७मध्ये महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात प्रवेश घ्यावा असे प्रतिपादन माजी उपसंचालक यशवंत मानखेडकर यांनी केले.

यशवंत माणखेडकर यांनी सन १९८५-८६ला महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयामध्ये समाजकार्य विभागाच्या बी.एस.डब्ल्यू.अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आणि सन १९८७-८८ ला बी.एस.डब्ल्यू.ची पदवी सध्याचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर येथून पाचव्या क्रमांकाने मेरिटमध्ये येऊन प्राप्त केली.

त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य प्रो.डॉ.सिद्राम डोंगरगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ते आपल्या भावना व्यक्त करताना बोलत होते. यावेळी समाजकार्य विभागाचे प्रो.डॉ.संजय गवई, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. गुणवंत बिरादार आणि मिरा मानखेडकर यांची उपस्थिती होती.
पुढे बोलताना यशवंत माणखेडकर म्हणाले की, मी अहमदपूर तालुक्यातील मानखेड या अत्यंत ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील एक विद्यार्थी होतो. बी.एस. डब्ल्यू.ला शिकत असताना दिवसभर महाविद्यालयाचे नियमित तास करायचे आणि संध्याकाळी तेलाच्या घाणीमध्ये काम करायचो. त्यामुळे माझ्या हाताला फोड यायचे म्हणून महाविद्यालयात येताना हातामध्ये हॅन्डग्लोज घालून येत होतो.

या अभ्यासक्रमामुळे मी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील संस्थांमध्ये उच्चस्थ पदावर कार्य करू शकलो. नुकताच सन २०२३मध्ये क्रीडा व खेल मंत्रालय, भारत सरकारच्या महाराष्ट्र राज्याच्या नेहरू युवा केंद्राच्या उपसंचालक पदावरून सेवानिवृत्त झालो. जगाच्या अनेक राष्ट्रांमध्ये जाऊन मी माझ्या कार्याची माहिती दिली आहे. तसेच अनेक राजकीय नेते आणि प्रशासकीय अधिकारी यांनाही मार्गदर्शन केले असून सध्या स्पर्धा परीक्षेच्या मुलाखतीच्या पॅनलवर मी कार्य करीत आहे.

आपल्या महाविद्यालयामध्ये स्पर्धा परीक्षा करिता माझ्या टीमद्वारे माजी विद्यार्थी म्हणून मी प्रयत्नशील राहील असे सांगून समाजकार्य विभागाच्या चाळीस वर्षांपूर्वीच्या आठवणीना त्यांनी उजाळा देऊन प्राचार्य प्रा.एम.एस. सितानगरे, प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार, प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, प्रा.बी.एस.पळसकर, स्व.प्रा. नागनाथ स्वामी, प्रा.गिरजाप्पा मुचाटे आणि डॉ.ईश्र्वर शेटकार यांची आठवण करून आभार व्यक्त केले. तसेच त्यांनी समाजकार्य विभाग, दुग्धशास्त्र विभाग, कुस्ती प्रशिक्षण केंद्र आणि महाविद्यालयाच्या परिसराची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन; आ. रमेशअप्पा कराड यांच्याकडून अभिवादन

**लातूर/प्रतिनिधी :** अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे मुरुड येथे आगमन झाले असून या निमित्ताने पुतळ्याची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सदरील पुतळ्याचे लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून लोकार्पण करण्यात येणार आहे.





लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पूर्णाकृती पुतळा बसविण्यासाठी अनेक वर्षापासून मुरुडकरांनी प्रयत्न केले मोठ्या प्रतिक्षेनंतर लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या माध्यमातून नाशिक येथील कारागरांनी तयार केलेला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अत्यंत आकर्षक आणि भव्य पूर्णकृती पुतळा नुकताच मुरुड नगरीत दाखल झाला. सदरील पुतळ्याची छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत वाजत गाजत फटाक्याची आतिषबाजी करत मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भव्य मिरवणूक काढण्यात आली. लवकरच भव्य कार्यक्रमाच्या माध्यमातून या पुतळ्याचे लोकार्पण होणार आहे.

मिरवणुकीच्या प्रारंभी लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांनी पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात बसविण्यात येणाऱ्या पुतळ्याच्या जागेची त्यांनी पाहणी करुन सुचना केल्या. यावेळी पु. भिकू पय्यानंद, भाजपाचे किसान मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंके, भाजपा मंडल अध्यक्ष सुरज शिंदे, प्रताप पाटील, मुरुडचे उपसरपंच वैभव सापसोड, भाजपाचे शहराध्यक्ष महेश कणसे, संगायो समिती अध्यक्ष बन्सी भिसे, सतीश आंबेकर, विश्वास कावळे, दीपक वांगसकर, सौ. लताताई भोसले, सुरज सूर्यवंशी, नागराज बचाटे, शुभम देवकर, रवी इटकर, दत्ता पुदाले, वैजनाथ हराळे, रवी माकोडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा कमिटीचे अध्यक्ष महेश सुरवसे, उपाध्यक्ष भालचंद्र धावारे, सचिव गौतम लांडगे, धनराज शिंदे, योगीराज साखरे, बाबा भिसे, शुभम खोसे यांच्यासह मुरुड येथील सर्व समाजातील नागरिक तरुण भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲड. समद पटेल यांच्या हस्ते सिटी फार्मा मेडीकल स्टोअरचे उद्घाटन





**लातूर/प्रतिनिधी :** खडक हनुमान मंदिरासमोर, मिलिंद नगर येथे सुसज्ज व २४ तास सेवा उपलब्ध असलेल्या सिटी फार्मा मेडीकल अँड जनरल स्टोअर्सचे उद्घाटन रविवार दि. ३ मे रोजी सायंकाळी ७ वाजता विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे वाईस चेअरमन ॲडव्होकेट समद पटेल यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या उद्घाटन सोहळ्यास अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर, शिक्षणविस्तार अधिकारी हमीद शेख, मौलाना झकेरिया, केंद्राचे मुख्याध्यापक एन. एम. शेख, माजी सरपंच शेख अब्दुल गनी, सत्तार पठाण (एलआयसी), भोयरेकर साहेब, नंदकिशोर सोनी, हय्या पटेल, अब्दुल लतीफ, सहाय्यक शिक्षक जि. प. उस्मानाबाद तसेच प्रा. अन्वर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी नवीन व्यवसायासाठी शुभेच्छा देत नागरिकांना दर्जेदार व तत्पर औषध सेवा उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. उद्घाटन कार्यक्रम उत्साहात पार पडला असून आयोजकांनी उपस्थितांचे आभार मानले.

## एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी कार्यालय लातूर यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र बी. प्लॅनिंग व कृषी तंत्रज्ञान या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एमएचटी-सीईटी २०२६ (एमबीए, पीसीबी व पीसीएम) ही परीक्षा एमबीए ग्रुपकरिता ९ मे, २०२६ रोजी ऑनलाईन पध्दतीने लातूर जिल्ह्यातील २ परीक्षा केंद्रावर, तसेच पीसीएम ग्रुपकरिता १२ ते २० मे, २०२६ ( दि. १६,१७ व १८ मे , २०२६ वगळून) या कालावधीत लातूर जिल्ह्यातील एकूण १४ परीक्षा केंद्रावर दोन सत्रामध्ये आयोजित केलेली आहे. या परीक्षा कालावधीमध्ये परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, यासाठी परीक्षा केंद्राच्या परिसरामध्ये भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी राहूल कुमार मीना यांनी लागू केले आहेत.

त्यामुळे परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रवेश करतेवेळी परिक्षार्थी व्यतिरिक्त पाचपेक्षा जास्त व्यक्ती एकत्रितरित्या प्रवेश करणार नाहीत. कोणत्याही प्रकारच्या घोषणा देण्यात येणार नाहीत. परीक्षा केंद्राच्या परिसरात परिक्षार्थी अथवा अन्य व्यक्तींकडून शांततेस बाधा निर्माण होईल असे कृत्य करण्यात येणार नाही. १०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स सेंटर्स, पानटपरी, टायपिंग सेंटर, एसटीडी बुथ, ध्वनिक्षेपक इत्यादी माध्यमे आदेशाची मुदत संपेपर्यंत बंद राहतील. परीक्षा केंद्रांच्या परिसरात मोबाईल फोन, सेल्युलर फोन, ई-मेल व इतर प्रसार माध्यमे घेवून प्रवेश करण्यास मनाई असेल. कोणत्याही व्यक्तीकडून परीक्षा सुरळीतपणे व शांततेच्या वातावरणामध्ये पार पाडण्यासाठी कोणतीही बाधा उत्पन्न करण्यात येणार नाही. परीक्षा केंद्रावर कोणत्याही अनाधिकृत व्यक्तीस, वाहनास प्रवेश मनाई राहील. हे आदेश परीक्षा केंद्रावर काम करणारे अधिकारी, कर्मचारी परीक्षार्थी केंद्रावर निगराणी करणारे अधिकारी व पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत त्यांच्या परीक्षासंबंधी कर्तव्ये पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाहीत. हे आदेश ९ ते २० मे, २०२६ (दि. १६,१७ व १८ मे, २०२६ वगळून) या कालावधीत सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत लागू राहतील.

# सातबारा उतारा बंद होणार!

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील ग्रामीण भागाचे अर्थकारण मोठ्या प्रमाणावर शेतीवर आधारित आहे. शेतकरी आणि शेती हा गावागावातील जीवनाचा केंद्रबिंदू मानला जातो. त्यामुळे राज्य सरकारकडून वेळोवेळी शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातात. अशातच आता शेतीशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या सातबारा उताऱ्याबाबत मोठा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील काही गावांमध्ये सातबारा उतारा बंद करून त्याऐवजी 'प्रॉपर्टी कार्ड' देण्याचा निर्णय महसूल विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे हजारो शेतकरी आणि नागरिकांना मोठा फायदा होणार असल्याचे सांगितले जात आहे.

हद्दवाढ झालेल्या गावांसाठी मोठा निर्णय

राज्यातील ज्या नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या हद्दीत नव्याने गावांचा समावेश झाला आहे, त्या भागांतील जमिनींसाठी सातबारा उतारा बंद करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. संबंधित भागांतील नागरिकांना आता त्यांच्या जमिनीचे 'प्रॉपर्टी कार्ड' अर्थात मालमत्ता पत्रक उपलब्ध करून दिले जाणार आहे.

या निर्णयामुळे शहरी भागात समाविष्ट झालेल्या गावांतील नागरिकांना जमीन नोंदींसंदर्भातील अनेक अडचणींमधून दिलासा मिळणार आहे. तसेच मालमत्तेच्या कागदपत्रांमध्ये सुसूत्रता आणि स्पष्टता येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जात आहे.

सध्या ग्रामीण भागात जमिनीची अधिकृत नोंद सातबारा उताऱ्यावर केली जाते. मात्र एखादे गाव महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाल्यानंतर त्या भागाचे स्वरूप बदलते. शेती जमीन हळूहळू निवासी, व्यावसायिक किंवा नागरी वापरासाठी वापरली जाऊ लागते. त्यामुळे अशा जमिनींसाठी सातबारा उताऱ्याऐवजी प्रॉपर्टी कार्ड अधिक उपयुक्त मानले जाते.

महसूल विभागाच्या माहितीनुसार, शहरांच्या वाढत्या विस्तारामुळे अनेक गावांचे रूपांतर नागरी वस्त्यांमध्ये होत आहे. अशा परिस्थितीत शहरी मालमत्ता व्यवस्थापनासाठी प्रॉपर्टी कार्ड अधिक कायदेशीर आणि सोयीचे ठरते. त्यामुळे भविष्यातील व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुलभ होणार आहेत.

या संदर्भात मंत्रालयात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक पार पडली. बैठकीत महसूल विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. गावांचा महानगरपालिका किंवा नगरपालिका हद्दीत समावेश झाल्यानंतर जमीन नोंदींच्या स्वरूपात बदल करण्याची आवश्यकता असल्याचे बैठकीत अधोरेखित करण्यात आले.

महसूलमंत्र्यांनी सांगितले की, अशा भागांमध्ये सातबारा बंद करून प्रॉपर्टी कार्ड लागू करणे कायदेशीरदृष्ट्या अधिक सुलभ राहील. या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य सरकारकडून लवकरच अधिकृत आदेश जारी केला जाणार आहे.

# ३०० अतिक्रमणे हटवली, मनपाची गंजगोलाईत जोरदार मोहीम





**लातूर/प्रतिनिधी :** गुरुवार दि. ७ मे रोजी महानगरपालिकेने शहरातील गंजगोलाई भागात अतिक्रमण हटाव मोहीम जोरदारपणे राबवली. यात जवळपास ३०० अतिक्रमणे हटविण्यात आली. यामुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.

गंजगोलाई हे लातूर शहरातील बाजारपेठेचे प्रमुख ठिकाण आहे.या ठिकाणी शहरासह जिल्ह्यातील येणाऱ्या नागरिकांची खरेदीसाठी गर्दी होते.या भागात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्यामुळे वारंवार वाहतूक कोंडी होत होती. खरेदीसाठी येणारे नागरिक व प्रवाशांनाही याचा त्रास होत होता. यामुळे मनपाने ही अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे.

पालिकेच्या वतीने दोन दिवसांपूर्वी स्वतःहून अतिक्रमणे काढून घेण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले होते. तरीही अतिक्रमणे कायम असल्याने गुरुवारी ही मोहीम राबवण्यात आली.पालिका आयुक्त श्रीमती मानसी मीना यांनी प्रत्यक्ष स्थळावर उपस्थित राहून या मोहिमेची पाहणी केली. अतिक्रमणे हटवण्यासाठी मनपाच्या वतीने पाच पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सकाळी ८ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही मोहीम सुरू होती. गंजगोलाईतील कापड गल्ली, भुसार लाईन, हनुमान चौकापासून गंजगोलाई कडे जाणारा मुख्य रस्ता, सुभाष चौक ते हनुमान चौक, लोखंड गल्ली,मज्जिद रोड, अण्णाभाऊ साठे चौक ते शाहू चौक, वीज वितरण कार्यालयाच्या पाठीमागील व बाजूच्या रस्त्यावरील अतिक्रमणे गुरुवारी काढण्यात आली.

मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त वसुधा फड यांनी केलेल्या नियोजनामुळे ही मोहीम यशस्वी झाली.शहरातील इतर भागातही अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येणार आहे.यापुढील काळात वारंवार अशा मोहिमा सुरू राहणार आहेत. त्यामुळे व्यापाऱ्यांनी आपापली अतिक्रमणे लवकरात लवकर काढून घ्यावीत, असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.